भारत सरकार मान्यताप्राप्त
दैनिक
Reg No. MAHMAR52974
dailysolapurizataka@gmail.com
सोलापुरी झटका
मुख्य संपादक : विकास नारायण वाघमारे मो. ९४२३२३५८५५, ७२१९६५३२५५
वर्ष : १ ले | अंक : ५२ वा | शनिवार ०४ जुलै २०२६ | PRGI No. MHMAR/26/A/2199 | किंमत ₹ ४.००

आषाढी वारीसाठी आरोग्य यंत्रणा 'अलर्ट'!

प्रत्येक पालखीसोबत ALS रुग्णवाहिकेची सूचना

वारकऱ्यांच्या सेवेसाठी सोलापूर जिल्हा परिषद सज्ज

भाजप जिल्हाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांचा नियोजन बैठकीत आरोग्य विभागाला सज्जतेचा आदेश

सोलापुरी झटका न्यूज
पंढरपूर । विनोद वाघमारे :
आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची जबाबदारी समर्थपणे पेलण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाने कंबर कसली असून संपूर्ण यंत्रणा 'अलर्ट मोड'वर आली आहे. वारी मार्गावर कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रत्येक पालखीसोबत अत्याधुनिक ALS रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यासह आरोग्य सुविधांचा सर्वंकष आराखडा तयार करण्याच्या सूचना भाजप सोलापूर जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिल्या.कासेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे झालेल्या आढावा बैठकीत वारी मार्गावरील आरोग्य सेवांचा सखोल आढावा घेण्यात आला. वैद्यकीय पथके, औषधसाठा, रुग्णवाहिका, आपत्कालीन उपचार, मुख्यमंत्री वारकरी सुविधा उपचार केंद्र, मुख्यमंत्री वारकरी निवारा उपचार केंद्र, मुख्यमंत्री आरोग्य रथ, आरोग्यदूत, मेडिसिन किट, उष्माघात व संसर्गजन्य आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच स्वच्छतेसंदर्भातील नियोजनावर सविस्तर चर्चा झाली.यावेळी चेतनसिंह केदार सावंत म्हणाले, आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या श्रद्धा, संस्कृती आणि सेवाभावाचा महापर्व आहे. लाखो वारकऱ्यांना वेळेत, सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत आरोग्य सेवेत त्रुटी राहता कामा नयेत. सर्व यंत्रणांनी समन्वयाने आणि जबाबदारीने

काम करावे.बैठकीत वारीदरम्यान कोणतीही आरोग्यविषयक अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक मनुष्यबळ, औषधे, वैद्यकीय साधनसामग्री आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.बैठकीस आरोग्य समिती सदस्य व्यंकटराव भालके, नागनाथ भोसले, शोभाताई खटकाळे, सविताताई कोकाटे, संगीताताई दुधाळ, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी 'हेल्थ मिशन'
आषाढी वारीत लाखो भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले असून वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, आरोग्य रथ, उपचार केंद्रे आणि आपत्कालीन सेवा २४ तास कार्यरत ठेवण्यात येणार आहेत. सेवा हीच वारीची खरी परंपरा या भावनेतून संपूर्ण यंत्रणा वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज असल्याचा विश्वास सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केला.

अति घाई संकटात नेई सांगोला पोलिसांचा थेट इशारा

हेल्मेट, वेगमर्यादा आणि वाहतूक नियमांबाबत जनजागृती रस्त्यांवर आकर्षक फलकांनी वेधले नागरिकांचे लक्ष

सोलापुरी झटका न्यूज
सांगोला/ प्रतिनिधी :
तालुक्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाहतूक शिस्तीची जाणीव निर्माण करण्यासाठी सांगोला पोलीस ठाण्याने 'अपघातमुक्त सांगोला' अभियान हाती घेतले आहे. या उपक्रमाअंतर्गत शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांवर जनजागृतीपर फलक उभारण्यात आले असून, अपघातग्रस्त दुचाकीचे प्रदर्शन करून निष्काळजी वाहनचालनेचे भीषण परिणाम नागरिकांसमोर मांडण्यात येत आहेत.या उपक्रमात **Helmet is Costly, But Brain is Priceless!** हा प्रभावी संदेश देत दुचाकीस्वारांना हेल्मेट वापरण्याचे महत्त्व पटवून दिले जात आहे. तसेच अति घाई संकटात नेई* या संदेशातून वेगमर्यादेचे पालन, मद्यपान करून वाहन न चालविणे, सीटबेल्टचा वापर आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या अपघातग्रस्त दुचाकीमुळे अनेक वाहनचालक थांबून माहिती घेत असून, सुरक्षित वाहनचालनेचा

संदेश अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. या अभिनव उपक्रमामुळे वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती वाढण्यास मदत होणार असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.सांगोला पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत या अभियानाची सुरुवात करण्यात आली. हेल्मेट आणि सीटबेल्टचा नियमित वापर करा, वेगमर्यादा पाळा, वाहतूक नियमांचे पालन करून स्वतःसह इतरांचाही जीव सुरक्षित ठेवा, असे आवाहन सांगोला पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

हेल्मेट महाग नाही... तुमचा जीव अमूल्य आहे !
अपघात टाळण्यासाठी नियमांचे पालन हाच सर्वोत्तम उपाय असून, प्रत्येक नागरिकाने जबाबदार वाहनचालक बनण्याचा संकल्प करावा, असा संदेश या जनजागृती मोहिमेतून देण्यात येत आहे.

ग्रामीण शिक्षणाला नवे बख !

२३ जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पाचवी सुरू

सोलापुरी झटका न्यूज
सोलापूर / प्रतिनिधी :
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक निर्णय; जिल्हा परिषद प्रशासनाने २३ प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पाचवी सुरू करण्यास मंजुरी दिलीग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातच दर्जेदार उच्च प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शासनाच्या दि. १५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील (GR) निकषांची पूर्तता करणाऱ्या जिल्ह्यातील २३ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू करण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांचा शिक्षणप्रवास अधिक सुलभ होणार असून ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे.या निर्णयासाठी शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी शासन निर्णयातील सर्व अटी व निकषांची पडताळणी करून वर्गवाढीस मंजुरी दिली. निर्णयाचे प्रमुख फायदे । गावातच पाचवीची सोय । विद्यार्थ्यांना शेजारच्या गावात जाण्याची गरज कमी ।। शाळा गळती रोखणे । विशेषतः मुलींचे शिक्षण सुरू ठेवण्यास मदत।। पालकांवरील ताण कमी । वाहतूक व इतर खर्चात बचत ।। RTE कायद्याला बळ । घराच्या जवळ शिक्षणाची सुविधा उपलब्ध । शाळा गळती रोखण्यास मदतयापूर्वी अनेक गावांतील विद्यार्थ्यांना चौथीनंतर पुढील शिक्षणासाठी शेजारच्या गावात जावे लागत होते. वाहतुकीची अडचण, आर्थिक परिस्थिती आणि सुरक्षिततेच्या कारणांमुळे अनेक विद्यार्थी, विशेषतः मुली, शिक्षण अर्धवट सोडत असल्याच्या तक्रारी वारंवार पुढे येत होत्या. आता गावातच पाचवीचा वर्ग उपलब्ध झाल्यामुळे ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.चेतनसिंह केदार-सावंत यांची प्रतिक्रियाग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी २३ जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता

पाचवी सुरू करण्यास मंजुरी मिळाली, ही आनंदाची बाब आहे. या निर्णयामुळे शाळा गळती कमी होऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठे बळ मिळेल. शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी आमचे प्रयत्न यापुढेही सुरू राहतील.- चेतनसिंह केदार-सावंत, सभापती, पान नं २ वर...

कौटुंबिक वादातून मारहाण

चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापुरी झटका न्यूज
सांगोला/ प्रतिनिधी :
तालुक्यातील महूद (मेटकरी वाडी) येथे कौटुंबिक वादातून एका शेतकऱ्यास शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी चौघांविरुद्ध महूद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सचिन भगवान कांबळे (वय ३५, रा. महूद) हे १ जुलै रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजता घरासमोर उभे असताना त्यांचे नातेवाईक सुरेश लक्ष्मण कांबळे यांनी तेथे येऊन शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर राणी तुपे हिने दगडाने डोक्यात मारहाण केली. तसेच नयना तुपे व अपर्णा सुरेश कांबळे यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून घराच्या दरवाजाचे नुकसान केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.या मारहाणीत जखमी झालेल्या फिर्यादीवर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल, सोलापूर येथे पाठविण्यात आले.याप्रकरणी सुरेश लक्ष्मण कांबळे, राणी तुपे, नयना तुपे व अपर्णा सुरेश कांबळे (सर्व रा. महूद, ता. सांगोला) यांच्याविरुद्ध महूद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

झाडांच्या मुळांची गळचेपी जीवावर बेततेय

दोषींवर सदोष मनुष्यवधा चा गुन्हा दाखल करा !

बेकायदेशीर काँक्रीटीकरण, निष्काळजी वृक्षछाटणी आणि प्रशासनाच्या हलगर्जीपणावर सुराज्य अभियानाचा घणाघात

सोलापुरी झटका न्यूज
मुंबई / प्रतिनिधी :
पावसाळ्यात कोसळणारी झाडे ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून, झाडांच्या मुळांची गळचेपी, बेकायदेशीर काँक्रीटीकरण, निष्काळजी वृक्षछाटणी आणि प्रशासनाच्या बेपर्वाईमुळे घडणारी मानवनिर्मित दुर्घटना* असल्याचा गंभीर आरोप सुराज्य अभियानाने केला आहे. अशा घटनांमध्ये नागरिकांचा मृत्यू झाल्यास संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ अंतर्गत 'सदोष मनुष्यवधा'चा गुन्हा दाखल करण्याची ठाम मागणी अभियानाने केली.मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेत सुराज्य अभियानाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक अभिषेक मुरुकटे आणि हिंदू जनजागृती समितीचे प्रवक्ते सतीश कोचरेकर यांनी ही भूमिका मांडली.मुरुकटे म्हणाले, दरवर्षी झाडे पडून नागरिकांचा जीव जातो, वाहने आणि मालमत्तेचे नुकसान होते; मात्र प्रत्येक वेळी जोरदार पाऊस किंवा वादळी वारे अशी कारणे देऊन प्रशासन जबाबदारी झटकते. प्रत्यक्षात झाडांच्या मुळांभोवती झालेले काँक्रीटीकरण, मुळांना हवा-पाणी न मिळणे आणि योग्य देखभालीचा अभाव हीच या दुर्घटनांची खरी कारणे असल्याचा दावा त्यांनी केला.मुंबईतील घटनांनी धोक्याची घंटाअलीकडील

काही घटनांनी हा प्रश्न अधिक गंभीर बनल्याचे अभियानाने सांगितले. चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळून ११ वर्षीय विहान श्रीवास्तवचा मृत्यू, खार येथे रिक्षावर झाड पडून १५ वर्षीय आरिका श्रीवास्तवचा मृत्यू, तसेच सांताक्रूझ, चर्चगेट आणि मरीन लाईन्स परिसरातील झाडे कोसळण्याच्या घटनांचा उल्लेख करण्यात आला.अधिकृत आकडेवारीनुसार, अलीकडील पावसाळ्यात मुंबईत झाडे व मोठ्या फांद्या पडण्याच्या ९१ घटना नोंदविण्यात आल्या आहेत.६५ टक्के झाडे काँक्रीटच्या विळख्यात संयुक्त सर्वेक्षणात रस्त्यालगतची सुमारे ६५ टक्के झाडे काँक्रीटच्या विळख्यात अडकलेली असल्याचा दावा करण्यात आला. तसेच हजारो झाडांच्या मुळांभोवती सिमेंट टाकल्याबाबत न्यायालयानेही नाराजी व्यक्त केली असून, राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात आली. प्रश्न पावसाचा नाही, झाडांच्या मुळांचा श्वास कोण थांबवत आहे, याचा आहे. वरून हिरवे दिसणारे झाड आतून कमकुवत झालेले असते आणि एक दिवस अचानक कोसळते, असे अभिषेक मुरुकटे यांनी स्पष्ट केले. सुराज्य अभियानाच्या प्रमुख मागण्या राज्यातील सर्व मोठ्या झाडांच्या मुळांची तातडीने संरचनात्मक तपासणी. प्रत्येक झाड कोसळल्यानंतर वैज्ञानिक पद्धतीने मूळ कारणांचा तपास अनिवार्य. बेकायदेशीर काँक्रीटीकरण करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारांवर फौजदारी कारवाई. सर्व झाडांभोवती किमान एक मीटर मोकळी मातीची जागा ठेवण्याच्या छ्रद्ध आदेशाची तातडीने अंमलबजावणी. राज्यभर विशेष डी-काँक्रीटीकरण मोहीम राबवून कृती अहवाल सार्वजनिक करणे. गेल्या तीन वर्षांतील वृक्षारोपण आणि प्रत्यारोपणाचे स्वतंत्र तृतीय पक्षीय लेखापरीक्षण. इशारा : न्यायालयीन लढ्याची तयारी झाडांच्या मुळांची गळचेपी थांबविण्यासाठी शासनाने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर न्यायालयीन लढा, अवमान याचिका आणि राज्यव्यापी जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा सुराज्य अभियानाने दिला.

झाडे वाचवा... जीव वाचवा!
एका बाजूला वृक्षसंवर्धनाचे फलक लावायचे आणि दुसऱ्या बाजूला झाडांची मुळे सिमेंटखाली गाडायची, हा दुटप्पीपणा आता थांबला पाहिजे. हा पर्यावरणाचा नव्हे, तर थेट नागरिकांच्या जीविताचा प्रश्न आहे, असा घणाघात अभिषेक मुरुकटे यांनी केला.

दैनिक सोलापुरी झटका अंक Whatsapp वर वाचण्यासाठी आपला Whatsapp नंबर व नाव SMS करा. 9423235855 / 7219653255